प्रेसनोट दि. १७/०७/२०१७

खुन, खुनाचा प्रयत्न असे गुन्हे दाखल असलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांना अटक करुन ५ पिस्टल व १६ काडतुसे गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक विभागाकडुन जप्त

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर,या पथकातील पोलीस पोना/३९५१ परवेज जमादार यांना दि. १५/०७/२०१७ रोजी बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील पुणे ग्रामीण जिल्ह्यातील वडगाव मावळ येथे राहणारे गुन्हेगार आरोपी नामे १) नितीन सुधाकर अवचिते वय ३० वर्षे, रा. हरणेश्वर वाडी, गवत बाजार, एस.टी. स्टॅन्ड मागे वडगाव ता. मावळ जिल्हा पुणे व यशवंतनगर भोसले वस्ती, साईबाबा नगर, येरावडा, पुणे व २) मयुर रामदास सुतार वय २९ वर्षे रा.घर नं.३,गणेश प्लाझा माळी नगर वडगाव मावळ, जिल्हा पुणे हे दोघेजण खुनाच्या गुन्ह्यातुन जामिनावर सुटलेले आहेत. ते दोघेजण पिस्टलसह संगमवाडी रोड येथील ट्रॅव्हल्स बस पार्कींग जवळ येणार आहेत अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कदम यांनी कारवाई करणेकरीता दोन पथके तयार करुन बातमीचे ठिकाणी दुपारी ०३.१५ वाजणेचे सुमारास छापा टाकुन वरील नमुद इसमांना ताब्यात घेतले आहे. त्यांचे कब्जातून २ गावठी बनवाटीचे पिस्टल मॅगझीनसह, व १३ जिवंत काडतुसे असा सर्व मिळून ८२,६००/- चा माल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांचे विरुध्द **येरवडा पोस्टे येथे गुरनं ५८६/२०१७ आर्म ॲक्ट कलम ७, ३ सह (२५), व मु.पो.ॲक्ट कलम ३७(१) सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यांच्या अनुषंगाने त्यांच्याकडे तपास करता त्यांनी प्राथमिक तपासात त्याचा साथिदार सागर बबन गोळे, रा. न्यु, पनवेल खांदा कॉलनी, बी टाईप सेक्टर ७, नवी मुंबई यास नितीन अवचिते याने ३ गावठी बनावटीचे पिस्टल विकले असल्याची माहिती प्राप्त झाली. सागर गोळे याचे बद्दल माहिती काढली असता तो मुंबई पुणे हायवे वरील हॉटेल हिल व्ह्यु येथे नियमीत येत असल्याची माहिती मिळाल्याने दि. १६/०७/२०१७ रोजी मध्यरात्री १२.०० वाजता त्यास हॉटेल हिल व्ह्यु समोर वडगाव मावळ येथे I20 कार नं MH-43-AJ-0091 या गाडी सह ताब्यात घेऊन कारची झडती घेतली असता गाडीचे डॅश बॉक्समध्ये एकुण ३ गावठी बनावटीचे पिस्टल व ३ काडतुसे असा किं.रु. १,२०,६००/- कारसह सर्व मिळुन किं.रु. ९,२०,६००/- चा माल जप्त करण्यात आला आहे. त्यास दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु असुन आरोपी हे दि. १८/०७/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीमध्ये आहेत.

आरोपींकडुन एकुण ५ पिस्टल व १६ काडतुसे अशा मालासह एक I20 कार क्र. MH-43-AJ-0091 असा एकुण एकुण कि.रु. १०,०३,२००/- चा माल जप्त केला आहे.

यातील अटक आरोपी नितीन अवचिते याचे विरुध्द खुनाचे व आर्म ॲक्टचे गुन्ह्यासह ४ गुन्हे दाखल आहेत. आरोपी मुयर सुतार याचेविरुध्द खुनाचे व आर्म ॲक्टचे गुन्ह्यासह गंभीर स्वरुपाचे एकुण ८ गुन्हे दाखल आहेत.